सातबारावर नाव नसलेल्या शेतकऱ्यांच्या नोंदी तयार करा - महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे
>> पान 2

एन. चंद्रशेखरन यांचा टाटा सन्सच्या अध्यक्षपदाचा राजीनामा; फेब्रुवारीपर्यंत पदभार सांभाळणार >> पान 3

कर्जाचे पुनर्गठन केलेल्या शेतकऱ्यांनाही कर्जमुक्तीचा लाभ द्या!
>> पान 4


# दैनिक आपला विदर्भ




रेडिओ मिरची घेऊन येत आहे, महाराष्ट्राच्या इतिहासाचे कमाल किस्से; सुबोध भावे यांच्या आवाजात रेडिओवर रंगणार 'असा घडला महाराष्ट्र'!

आतील पान

**सुविचार**

कोण काय म्हणेल यापेक्षा आपण काय करू शकतो हे महत्त्वाचं.

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 05 ■ अंक 28 ■ गुरूवार, दि. 13 ऑगस्ट 2026 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

## पेपरफूट, परीक्षा गैरप्रकार संदर्भात केंद्राचा कायदा राज्यात लागू करणार

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई । प्रतिनिधी :** महाराष्ट्रात विविध सेवाभरतींसाठी होर्णाया परीक्षा पद्धतीत सर्वसमावेशक, अधिक सुरक्षित आणि सर्वसंमतीने सुधारणांसाठी एक उच्चस्तरीय समिती गठीत करण्याचा निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी घेतला. या समितीने राज्यात प्रत्येक विभागात जाऊन विद्यार्थ्यांशी संवाद साधत सर्वकष सुधारणांबाबत अहवाल सादर करायचा आहे. पेपरफूट, परीक्षा गैरप्रकार संदर्भात केंद्राचा कायदा राज्यात लागू करणार असल्याचे मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले.



वर्षा निवासस्थानी आयोजित या बैठकीला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेसुद्धा उपस्थित होते, त्यांनीही अनेक उपयुक्त सूचना या बैठकीत केल्या. मुख्यमंत्र्यांनी गठीत केलेली उच्चस्तरीय समिती सामान्य प्रशासन विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिव व्ही. राधा यांच्या अध्यक्षतेत राहणार असून राज्याचे पोलीस म हासंचालक सदानंद दाते, माहिती-तंत्रज्ञान विभागाचे सचिव वीरेंद्र सिंग, पशुसंवर्धन विभागाचे सचिव डॉ. एन. रामास्वामी आणि नाशिक विभागीय आयुक्त प्रवीण गेडाम यांचा त्यात समावेश असेल. या समितीने प्रत्येक महसुली विभागात जाऊन विद्यार्थी, शिक्षण संस्थाचालक आणि संबंधित घटकांशी चर्चा करून त्यांची मते जाणून घ्यायची आहेत. त्याआधारावर राज्यासाठीचे समग्र धोरण ठरेल.

अलिकडेच केंद्र सरकारने पेपरफूट आणि परीक्षा गैरव्यवहारासंदर्भात संसदेत एक कायदा केला आहे. महाराष्ट्राचाही स्वतंत्र कायदा आहेच. तथापि संसदेने केलेला कायदा अधिक कठोर असल्याने तो महाराष्ट्रातही लागू करण्यासंदर्भात येर्णाया पंधरवड्यात प्रक्रिया पूर्ण करण्यात यावी, असेही निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी दिले.

राज्यात २५ हजार क्लासरूम उभारणार

राज्यात किमान २५ हजार सुरक्षित क्लासरुम उभारण्यात याव्यात, असेही निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या बैठकीत दिले. या विविध परीक्षांमध्ये जिल्हाधिकारी, पोलीस आयुक्त, पोलीस अधीक्षक, शिक्षण विभागाचे वरिष्ठ अधिकारी यांचीही समन्वय भूमिका, इतर विविध देशांमधील परीक्षा पद्धती, विद्यम ान प्रक्रिया आणि त्यातील विविध संभाव्य सुधारणा अशा अनेक विषयांवर यावेळी सांगोपांग चर्चा झाली. राज्याचे मुख्य सचिव राजेश अग्रवाल आणि इतर वरिष्ठ अधिकारी या बैठकीला उपस्थित होते.

## रस्त्यावर राहणाऱ्या बालकांच्या पुनर्वसनासाठी फिरते पथक योजना – मंत्री आदिती तटकरे

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई । प्रतिनिधी :** बाल भिक्षेकरी समस्येचे समूळ उच्चाटन करून या बालकांच्या पुनर्वसनासाठी राबविण्यात येत असलेली फिरते पथक योजना जलदगतीने कार्यान्वित करावी. यासाठी आवश्यक कार्यवाही तातडीने पूर्ण करावी, असे निर्देश महिला व बाल विकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिले.

महिला व बाल विकास मंत्री तटकरे यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात यासंदर्भात बैठक झाली. यावेळी महिला व बाल विकास विभागाचे सचिव डॉ. अनुपकुमार यादव तसेच संबंधित अधिकारी उपस्थित होते. महिला व बाल विकास मंत्री तटकरे म्हणाल्या, रस्त्यावर राहणाऱ्या बालकांच्या पुनर्वसनासाठी राज्यात फिरते पथक योजना कायमस्वरूपी सुरू करण्यास शासनाने मान्यता दिली आहे. राज्यातील २८ महानगरपालिका क्षेत्रांमध्ये प्रत्येकी एक पथक, तसेच बृहन्मुंबई शहर, मुंबई उपनगर पूर्व आणि मुंबई उपनगर पश्चिम यासाठी प्रत्येकी एक पथक, अशी एकूण ३१ फिरती पथके कार्यान्वित करण्यात येणार आहेत. या पथकांच्या निवड प्रक्रियेसह आवश्यक कार्यवाही तातडीने पूर्ण करून योजना प्रत्यक्ष कार्यान्वित करावी, असे निर्देश मंत्री आदिती तटकरे यांनी दिले.

रस्त्यावर राहणाऱ्या बालकांचा शोध घेणे, त्यांना सुरक्षित वातावरण उपलब्ध करून देणे आणि त्यांच्या पुनर्वसनासाठी आवश्यक उपाययोजना करणे, यासाठी ही पथके महत्त्वपूर्ण ठरणार आहेत. बालकांच्या हिताशी संबंधित असलेल्या या योजनेची अंमलबजावणी करताना अधिकाऱ्यांनी संवेदनशीलता आणि जबाबदारीने काम करावे. प्रत्येक बालकाला सुरक्षितता, संरक्षण आणि पुनर्वसनाची संधी मिळेल, यासाठी यंत्रणेने प्रभावीपणे काम करावे, असेही मंत्री तटकरे यांनी स्पष्ट केले.

## खतांच्या 'लिंकिंग' विरोधात कठोर कारवाई करा – कृषिमंत्री भरणे

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई । प्रतिनिधी :** शेतकऱ्यांशी संबंधित विषय संवेदनशील पद्धतीने हाताळावा आणि खतांचे लिंकिंग करणाऱ्या कृषी केंद्रांवर तातडीने कारवाई करावी, असे निर्देश कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिले. मंत्रालयात कृषिमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली खतांवरील लिंकिंगच्या अनुषंगाने विशेष बैठक पार पडली, यावेळी शेतकरीहित सर्वोच्च मानून कठोर पावले उचलण्याचे निर्देश कृषिमंत्री भरणे यांनी दिले. अर्थसंकल्पीय अधिवेशनात आमदार अभिजीत पाटील यांनी याबाबत प्रश्न मांडला होता. त्याअनुषंगाने खतांच्या लिंकिंगच्या संदर्भातील तक्रारी सोडविण्यासाठी कृषिमंत्री भरणे आणि वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे, आमदार सुरेश धस, आमदार अभिजित पाटील यांच्यासह कृषी विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठक मंत्रालयात आयोजित करण्यात आली होती.



कंपनी ते घाऊक विक्रेता, घाऊक विक्रेता ते किरकोळ विक्रेता आणि किरकोळ विक्रेता ते शेतकरी अशा तीन स्तरांवर चालणारी ही साखळी तोडून शेतकऱ्यांना प्राधान्याने दिलासा द्यावा, अशी मागणी यावेळी आमदार धस यांनी केली. शेतकऱ्यांना नाहक खर्चात टाकण्याचे प्रकार नांदेड जिल्ह्यात होत आहेत, असे आमदार धस म्हणाले. त्यावर रासायनिक खतावरील लिंकिंग निदर्शनास आल्यास संबंधित उत्पादक व विक्रेत्यांविरुद्ध क्षेत्रीय निरीक्षकांनी तातडीने कारवाई करावी. अनुदानित रासायनिक खतांबरोबर बायोस्टिम्युलंट, पीडीएम, प्रॉम, जैविक खते, कीटकनाशके, सूक्ष्म अन्नद्रव्ये अशी विनाअनुदानित उत्पादने शेतकऱ्यांना सक्तीने विकण्याचे प्रकार रोखण्यासाठी कृषि विभागाच्या यंत्रणेने राज्यभर कठोर कारवाई करावी, असे निर्देश कृषिमंत्री भरणे यांनी दिले.

आतापर्यंतची कारवाई

राज्यात खताचे एकूण ५१,०८० विक्रेते असून त्यापैकी ४२,६२८ विक्रेत्यांची तपासणी आतापर्यंत पूर्ण करण्यात आली आहे. १० ऑगस्ट २०२६ अखेर १,०५२.७४ मेट्रिक टन इतका खतसाठा जप्त करण्यात आला असून त्याचे एकूण मूल्य ४ कोटी ३८ लाख रुपये इतके आहे. राज्यभरात आतापर्यंत खताचे १,२०३ विक्री परवाने निलंबित करण्यात आले असून, तर २८४ विक्री परवाने पूर्णपणे रद्द करण्यात आले आहेत. खत निविष्ठा विक्रेत्यांच्या तपासणीदरम्यान आजपर्यंत एकूण १,६३३ ठिकाणी विक्री बंद करण्याचे आदेश बजावण्यात आले आहेत. खताच्या अनियमिततेच्या संदर्भात राज्यात एकूण ७३ ठिकाणी गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. लिंकिंगबाबत जनजागृती करण्यासाठी राज्यातील ४१,३३७ कृषी विक्रेता केंद्रांवर फलक लावण्यात आले असून, राज्यस्तर, विभागस्तर, जिल्हास्तर व तालुका स्तरावर मिळून एकूण ४४ भरारी पथकांची स्थापना करण्यात आली आहे.

शेतकऱ्यांसाठी तक्रार यंत्रणा

शेतकऱ्यांना लिंकिंगबाबत थेट तक्रार करता यावी यासाठी ९८२२४४६६५५ हा व्हॉट्सॲप क्रमांक उपलब्ध करून देण्यात आला असून, आतापर्यंत यावर २७२ तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. त्यापैकी १४९ तक्रारींचे निराकरण करण्यात आले असून उर्वरित तक्रारींवर कार्यवाही प्रगतिपथावर आहे. तसेच जिल्हा व राज्यस्तरावर तक्रार दाखल करण्यासाठी स्वतंत्र नियंत्रण कक्षांचीही स्थापना करण्यात आली आहे.

## कर्जमाफीला कोणतीही मुदत नाही; शेवटच्या शेतकऱ्याला मिळणार मदत : मंत्री पाटील



**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई । प्रतिनिधी :** राज्य सरकारनं जाहीर केलेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६' अंतर्गत येणाऱ्या सर्व शेतकऱ्यांची कर्जमाफी केली जाईल, अशी घोषणा सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी केली. यावेळी बोलताना ते म्हणाले की, जोपर्यंत शेवटच्या शेतकऱ्यापर्यंत कर्जमाफी पोहोचत नाही, तोपर्यंत हे काम चालणार आहे.

यावेळी बोलताना मंत्री बाबासाहेब पाटील म्हणाले की, ''१७ लाख शेतकऱ्यांची यादी सरकारनं दिलीय. यातील १२ लाख ८० हजार शेतकऱ्यांची ई केवायसी झाली. ६ लाख २२ हजार शेतकऱ्यांना आतापर्यंत मदत देण्यात आलीय. उर्वरित ६ लाख ५० हजार शेतकऱ्यांना पुढच्या आठवड्यात मदत मिळणार आहे.''

पुढे बोलताना मंत्री बाबासाहेब पाटील म्हणाले की, आमच्यातर्फे वेळेची कोणतेही अट ठेवण्यात आलेली नाही. ज्या कोणत्या त्रुटी शिल्लक असतील, त्या त्रुटी पूर्ण करून शेतकऱ्यांनी लवकरात लवकर कर्जमाफीचा लाभ घ्यावा. दोन महिन्याची अट, एक महिन्याची अट अशा प्रकारच्या बातम्या ज्या येत आहेत, त्या खोट्या असून अशी कोणतीही अट सरकारतर्फे ठेवण्यात आलेली नाही. मात्र शेतकऱ्यांनी स्वत: त्या त्रुटी सुधारायला हव्यात.

मृत शेतकऱ्यांच्या वारसांना मिळणार रक्कम : यावेळी बोलताना मंत्री बाबासाहेब पाटील म्हणाले की, मृत शेतकऱ्यांच्या वारसांना कर्जमाफीची रक्कम मिळणार आहे. मृत शेतकऱ्यांचे आपण वारस आहोत, हे सिद्ध झाल्यास संबंधित शेतकऱ्यांच्या वारसांना कर्जमाफीची मदत मिळणार आहे. ५० हजार मृत शेतकऱ्यांच्या वारसांना ही कर्जमाफी देण्यात आली आहे.

कर्जमाफीनंतर प्रोत्साहन अनुदान : शेतकऱ्यांना सरकारतर्फे प्रोत्साहन अनुदान देण्यात येते. आधी शेतकऱ्यांची कर्जमाफी पूर्ण झाल्यानंतर शेतकऱ्यांना प्रोत्साहन अनुदान देण्यात येईल, असंही यावेळी सांगण्यात आलं. आधी कर्जमाफीची प्रक्रिया पूर्ण करण्यात येईल आणि त्यानंतरच प्रोत्साहन अनुदानाची प्रक्रिया केली जाईल, असंही ते म्हणाले.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात सर्व व्यवस्थित : राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये सर्व गोष्टी व्यवस्थित सुरू असून उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या नेतृत्वाखाली आमची वाटचाल सुरू आहे. आमच्यात कोणतेही मतभेद नाहीत. पक्षात सर्व व्यवस्थित सुरू आहे, असंही यावेळी बाबासाहेब पाटील म्हणाले.

## एकाच छताखाली भारताची रंगीबेरंगी कारागिरी १४ ऑगस्टपासून स्वदेशी एक्स्पोचा जल्लोष

**दैनिक आपला विदर्भ**

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी :** ओडिशाची पट्टचित्र कला, राजस्थानची पिचवाई, झारखंडची सोहराय, बिहारची मधुबनी, उत्तराखंडची ऐपण व महाराष्ट्राची पैठणी अशा देशाच्या विविध भागांतील पारंपरिक कलांचा रंगीबेरंगी आविष्कार छत्रपती संभाजीनगरात एकाच छताखाली अनुभवता येणार आहे. १४ ते १६ ऑगस्टदरम्यान सागर रिसॉर्ट्स येथे होणाऱ्या स्वदेशी फॅशन व लाईफस्टाईल एक्स्पोमध्ये देशभरातील सुमारे ७५ प्रदर्शक सहभागी होत असून त्यापैकी सुमारे ८० टक्के महिला उद्योजक व लघुउद्योजक आहेत. भारत सरकारच्या सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग मंत्रालयाच्या सहकार्याने शिखाज कारागीरी संस्थेच्या समन्वयातून होणाऱ्या या एक्स्पोला राष्ट्रीय ताग मंडळाचे सहकार्य लाभले आहे. ट्रायफेडमार्फत सहा आदिवासी कलाकार, ओडिशातील पट्टचित्र कलेचे चार, राजस्थानातील पिचवाईचा एक, झारखंडमधील सोहरायचे दोन, बिहारमधील मधुबनीचे दोन व उत्तराखंडमधील ऐपण कलेचे चार कलाकार सहभागी होणार आहेत. पैठणीचे दोन प्रदर्शकही सहभागी होतील.

## राज्यातील १३५ आयुर्वेदिक उत्पादकांना कारणे दाखवा नोटीस

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई । प्रतिनिधी :** राज्यात हॉटेल्स आणि औषध विक्रेत्यांविरोधात सुरू असलेल्या धडक मोहिमेनंतर आता अन्न व औषध प्रशासनाच्या (एफडीए) रडारवर राज्यातील आयुर्वेदिक औषध उत्पादक संस्था आल्या आहेत. 'एफडीए'ने घेतलेल्या शोधमोहिमेत नियमांचे उल्लंघन आणि गंभीर त्रुटी आढळल्यामुळे राज्यातील तब्बल १३५ आयुर्वेदिक उत्पादक संस्थांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे, तर कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या १० आयुर्वेदिक औषध उत्पादकांचे परवाने कायमस्वरूपी रद्द करण्यात आले आहेत.

महाराष्ट्रात सद्य:स्थितीत एकूण ४३४ परवानाधारक आयुर्वेदिक उत्पादक संस्था कार्यरत आहेत. या सर्व संस्थांची तपासणी मोहीम 'एफडीए'कडून राबवण्यात आली. या मोहिमेदरम्यान 'औषधे व सौंदर्य प्रसाधने कायदा १९४०' आणि त्याअंतर्गत 'नियम १९४५', तसेच त्यातील 'परिशिष्ट टी'मधील उत्पादन पद्धतींच्या निकषांचे कितपत पालन होते, याची प्रत्यक्ष पडताळणी करण्यात आली. या अंतर्गत उत्पादक संस्थांच्या कारखान्याची जागा, मंजूर तांत्रिक मनुष्यबळाची उपलब्धता, गुणवत्ता नियंत्रण विभागाचे प्रत्यक्ष काम काज, कच्चा व तयार मालाच्या चाचण्यांच्या नोंदी, प्रमाणित कार्यपद्धती (एसओपी), वितरण अभिलेख, तक्रार नोंदवही आणि स्थिरताविषयक माहिती अशा विविध तांत्रिक बाबींची सूक्ष्म छाननी करण्यात आली. या छाननीअंती नियमांना हरताळ फासणाऱ्या १३५ संस्थांना कारणे दाखवा नोटीस बजावून तात्काळ स्पष्टीकरण देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

'एफडीए'च्या पथकांनी केलेल्या तपासणीत अनेक कारखान्यांमध्ये औषधांच्या गुणवत्तेशी तडजोड केली जात असल्याचे समोर आले आहे. यामध्ये प्रामुख्याने मान्यताप्राप्त तांत्रिक व्यक्तींच्या अनुपस्थितीतच औषधांचे उत्पादन करणे, गुणवत्ता नियंत्रण विभाग पूर्णपणे बंद किंवा कार्यरत नसणे, औषध निर्मिती व चाचणीसाठी आवश्यक असलेली यंत्रसामग्री व उपकरणे उपलब्ध नसणे, तसेच कारखाना परिसर अत्यंत अस्वच्छ आणि निकषांना धरून नसणे अशा त्रुटी आढळल्या. याशिवाय बॅच उत्पादन अभिलेख आणि कच्च्या मालाच्या नोंदी न ठेवणे, औषधांच्या लेबलांवर चुकीचा उत्पादन दिनांक नमूद करणे, परिशिष्ट 'टी' प्रमाणे संस्थेचा मंजूर नकाशा उपलब्ध नसणे, कर्मचाऱ्यांच्या वैद्यकीय तपासणीच्या व प्रशिक्षणाच्या नोंदींचा अभाव असणे आणि औषधे दूषित होऊ नयेत यासाठी आवश्यक कार्यपद्धतीचा अवलंब न करणे, अशा अनेक त्रुटी तपासणीदरम्यान उघडकीस आल्या आहेत.





## 'गण गण गणात बोते'च्या जयघोषात गजानन महाराजांची पालखी बिबीत दाखल

**दैनिक आपला विदर्भ**

**बिबी :** लोणार तालुक्यातील बिबी नगरीत संत श्री गजानन महाराजांच्या पालखीचे बुधवार, दि. १२ ऑगस्ट रोजी भक्तिमय वातावरणात उत्स्फूर्त स्वागत करण्यात आले. पालखीच्या आगमनाने संपूर्ण बिबी नगरी 'गण गण गणात बोते'च्या जयघोषाने दुमदुमून गेली.

पालखीच्या स्वागताची तयारी गावकऱ्यांनी एक दिवस अगोदरच सुरू केली होती. मंगळवारी मुख्य मार्गाची स्वच्छता करून परिसर सजविण्यात आला होता. बुधवारी पालखी मलकापूर फाट्यावर दाखल होताच फटाक्यांची आतषबाजी करण्यात आली. वारकरी व पालखी सोहळ्याचे गावकऱ्यांनी उत्साहात स्वागत केले. पालखी मार्गावर ठिकठिकाणी आकर्षक रांगोळ्या काढण्यात आल्या होत्या.





संत श्री गजानन महाराजांच्या पालखीचे दर्शन घेण्यासाठी बिबीसह परिसरातील भाविकांनी मोठी गर्दी केली. पालखीचा मुक्काम वसंतराव नाईक कनिष्ठ महाविद्यालय, बिबी येथे करण्यात आला आहे. दर्शनासाठी भाविकांनी शिस्तबद्ध रांगा लावून श्रींचे दर्शन घेतले.

पावसाचे वातावरण लक्षात घेऊन भाविकांची गैरसोय होऊ नये, यासाठी आयोजकांच्या वतीने वॉटरप्रूफ मंडपाची व्यवस्था करण्यात आली होती. त्यामुळे भाविकांना सुरक्षितपणे दर्शन घेता आले.

पालखी सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर बिबी पोलीस स्टेशनचे ठाणेदार गजानन सोनटक्के यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांनी चोख बंदोबस्त ठेवला. भक्ती, उत्साह आणि वारकरी परंपरेने भारलेल्या वातावरणात पालखीचे बिबी नगरीत आगमन झाल्याने भाविकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

## दोडामार्ग परिसरात ९० गावे पर्यावरणीय दृष्ट्या संवेदनशील

पश्चिम घाटातील सुमारे ५६ हजार चौरस किलोमीटर क्षेत्राचे संरक्षण निश्रि्चत झालेले नसताना उत्खनन आणि विकासकामांचा रेटा सुरूच आहे. त्यामुळे दुर्मीळ वनस्पती, वन्यजीव, नद्यांचे उगम असलेल्या सह्याद्रीचे अस्तित्व धोक्यात आले आहे. माधवराव गाडगीळ ते संजयकुमार अशा १५ वर्षांत पाच कमिट्यांच्या अहवालानंतरही अद्याप पश्चिम घाटातील ५६ हजार चौरस किलोमीटर क्षेत्र संरक्षित न झाल्याने हा जैवविविधतेतील जागतिक हॉटस्पॉट आजही वाऱ्यावर आहे. या भागामध्ये कोणतेही खाणकाम होऊ नये, असे स्पष्ट असताना बॉक्साईटपासून वाळूपर्यंत अनेक खनिज उत्खननासाठी पश्रि्चम घाट पोखरला जात असल्याने जैवविविधतेचा हा अमूल्य साठा धोक्यात आहे. पर्यावरणीय संवेदनशील म्हणून या प्रदेशाकडे पाहिले जाते. विविध सात प्रकारच्या खनिजांसाठी डोंगर पोखरणे सुरू आहे. त्यामुळे आता नव्या मसुद्याला वेळ न घालता माधवराव गाडगीळ समितीने सुचविल्याप्रमाणे हा भाग संरक्षित करणे अनिवार्य आहे. सह्याद्रीच्या पट्ट्यात दगड, माती, मुरुम, सिलिका आणि बॉक्साईट यांसारख्या गौण व मुख्य खनिजांचे मोठ्या प्रमाणावर उत्खनन सुरू आहे. वाढते रस्ते, रेल्वे व नागरी प्रकल्पांमुळे डोंगर पोखरले जात असून, यामुळे पर्यावरणाचा समतोल बिघडत चालला आहे. सिंधुदुर्गातील मायनिंगच्या प्रकल्पांवर अनेकांचा डोळा आहे. दोडामार्ग परिसरात ९० गावे पर्यावरणीय दृष्ट्या संवेदनशील असताना येथे मायनिंग उत्खननाचा आणि विनाशकारी रासायनिक प्रकल्पांचा रेटा सुरू आहे. केंद्र सरकारच्या नव्या अधिसूचनेनुसार पश्चिम घाटातील मोठे क्षेत्र संवेदनशील जाहीरझाले; मात्र त्याची मुदत पुढील वर्षासाठी आहे. त्यामुळे वर्षभर संवेदनशील भाग वाऱ्यावरच असणार आहे. येथील निसर्गाचे रक्षण करणे आणि पर्यावरणाला हानी न पोहोचवणे ही सामुदायिक जबाबदारी असताना त्याकडे दुर्लक्ष होताना दिसते. मुंबईसारख्या महानगरापासून प्रदूषणाचा महाराक्षस निर्माण होत असताना पश्चिम घाट ऑक्सिजनचा हॉटस्पॉट म्हणून या भागाला तारत आहे. भावी पिढीसाठी त्याचे जतन व संवर्धन आवश्यक आहे. त्यामुळे पर्यावरणीय संवेदनशील क्षेत्र जाहीर करून त्याची काटेकोर अंमलबजावणी होणे आवश्यक असताना वाढत्या विकासाच्या रेट्यामध्ये निसर्ग संवर्धन कुठे तरी बाजूला पडल्याचे चित्र आहे. या प्रदेशात पट्टेरी वाघांपासून सिंह, माकड, नीलगिरी तहर अशा जातीचे दुर्मीळ प्राणी येथे पाहायला मिळतात. शेकरू, ब्लॅक पँथर या जाती दुर्मीळच आहेत. येथे ५५०० हून अधिक फुलांच्या वनस्पती प्रजाती आढळतात. त्यापैकी सुमारे ४० टक्के वनस्पती या केवळ याच भागात आहेत. सेरोपेगिया या कुळातील अनेक प्रजाती पश्रि्चम घाटातच आढळतात. यांची फुले मेणबत्तीच्या कारंजासारखी दिसतात. ही अतिशय दुर्मीळ व संकटग्रस्त आहे. मोठा भुत्या हा उंच जंगलात आढळणारा दुर्मीळ वृक्ष ठेवा जतन करणे आवश्यक असताना जंगलांची होणारी सर्रास तोड मनुष्यजातीलाही घातक ठरणारी आहे. गेली १६ वर्षे संरक्षित क्षेत्राची चर्चा सुरू आहे. प्रत्येकवेळी नवा मसुदा प्रसिद्ध होतो. हरकती मागवल्या जातात. काही गावे वगळली जातात, काही गावे समाविष्ट केली जातात. हे सत्र असेच सुरू राहिले, तर संरक्षित क्षेत्र शोधण्याची वेळ येणार आहे. त्यामुळे या जंगलाचे संवर्धन करण्यासाठी यावर तातडीचे निर्णय अपेक्षित आहेत. कारण, जगातील ३६ महत्त्वाच्या जैवविविधता संवेदनशील स्थळांपैकी सह्याद्री हा एक आहे. ही पर्वतरांग हिमालयापेक्षाही प्राचीन असून या पर्वतरांगेमधून कृष्णा, गोदावरी, कावेरी, कोरीयार यासारख्या प्रमुख नद्यांचा उगम होतो. त्यामुळे कोकण किनारपट्टीवरील जलसाठ्याचे हे प्रमुख केंद्र आहे. सहा राज्यांमध्ये हा प्रदेश येत असला, तरी कोकण किनारपट्टी ही संवेदनशील क्षेत्रातील प्रमुख केंद्र आहे. त्यामुळे केवळ अधिसूचना काढून आणि वेळकाढू धोरण अवलंबून या प्रदेशाचे संरक्षण थांबवता येणार नाही. डॉ. माधवराव गाडगीळ यांनी पहिला अहवाल २०११ ला दिला होता. त्यानंतर या समितीच्या अहवालाची अधिसूचना २०१४ मध्ये काढण्यात आली. तेव्हापासून आतापर्यंत १६ वर्षे गेली. आता २,५१५ गावे संवेदनशील क्षेत्रात येत असल्याचे नव्या अधिसूचनेत म्हटले आहे. आता संजयकुमार यांच्या अध्यक्षतेखाली समिती काम करत आहे. ६० दिवसांच्या हरकतीनंतर राज्याशी चर्चा करून हा मसुदा निश्चित होणार आहे; मात्र या सर्व प्रक्रियेला एक वर्ष उलटणार असल्याने पश्चिम घाटाच्या जैवविविधतेचे हे महत्त्वाचे क्षेत्र एक वर्ष तरी अधांतरीच राहणार आहे.

# सातबारावर नाव नसलेल्या शेतकऱ्यांच्या नोंदी तयार करा - महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई । प्रतिनिधी** : राज्यातील ज्या शेतकऱ्यांची नावे सातबारा उताऱ्यावर नाहीत किंवा इतर अधिकारात ज्यांच्या नावांची नोंद नाही, अशा सर्व शेतकऱ्यांच्या नोंदी तयार करण्याचा निर्णय महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी घेतला आहे. या निर्णयामुळे राज्यातील सुमारे दोन लाख ३१ हजार शेतकऱ्यांचा 'फार्मर आयडी' मिळण्याचा मार्ग मोकळा होणार असून, त्यांना शासकीय योजनांचा लाभ मिळणे सुलभ होणार आहे. यासंदर्भात सर्व जिल्हाधिकाऱ्यांनी १५ दिवसांत अहवाल सादर करण्याचे आदेश महसूलमंत्र्यांनी दिले आहेत.

महसूल मंत्री बावनकुळे यांच्या मंत्रालयातील दालनात झालेल्या बैठकीला मत्स्योद्योग मंत्री नितेश राणे, कृषीमंत्री दत्तात्रय भरणे (ऑनलाईन), आमदार निलेश राणे, आमदार दीपक केसरकर, महसूल, सहकार व कृषी विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. राज्यामध्ये दोन लाख ३१ हजार शेतकऱ्यांना 'फार्मर आयडी' तयार होत नसल्याची बाब समोर आली होती. मयत शेतकरी, वडिलांच्या नावे जमीन असून, मुलाचे नाव अद्याप सातबारावर लागलेले नाही, शेतकऱ्यांना देण्यात आलेल्या 'कबुलायतदार' जागांवर सरकारचे नाव लावण्यात आले आहे अशा विविध कारणांनी प्रत्यक्ष शेती करीत असलेल्या अशा शेतकऱ्यांना पीककर्ज मिळत नाही तसेच घेतलेल्या कर्जाला कर्जमाफीचा लाभ मिळत नाही. सिंधुदुर्ग जिल्ह्यात १२०७ शेतकऱ्यांचे 'फार्मर आयडी' अद्याप निघालेले नाहीत, या अनुषंगाने या बैठकीत चर्चा करण्यात आली.

यासंदर्भातील अडचणींची दखल घेत महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी जे प्रत्यक्ष शेती कसतात परंतु त्यांचे नाव सातबारा किंवा इतर अधिकारात नाही, अशा शेतकऱ्यांच्या जमिनीची सर्व कागदपत्रे गोळा करून सहकार विभागाकडे पाठविण्यात यावीत. यासाठी एक स्वतंत्र फॉरमॅट तयार करून सर्व जिल्हाधिकाऱ्यांकडून १५ दिवसांत अहवाल मागविण्यात यावा, असे निर्देश जमाबंदी आयुक्तांना दिले. लवकरच जिल्हाधिकाऱ्यांची बैठक घेऊन याबाबतचे आदेश निर्गमित करण्यात येणार आहेत. कृषीमंत्री



दत्तात्रय भरणे यांनी, राज्यातील सर्व शेतकऱ्यांचा अचूक डेटा तयार करून सर्वांना अधिकृत यादीवर आणले जाईल. जे खऱ्या अर्थाने शेतकरी आहेत, मात्र तांत्रिक अडचणींमुळे त्यांना कर्जमाफी मिळालेली नाही, अशा सर्व शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ मिळवून देण्यासाठी शासनस्तरावर विशेष प्रयत्न केले जातील, असे यावेळी सांगितले.

## नांदेड रजिस्ट्री कार्यालयातील अनधिकृत दलालांचा सुळसुळाट थांबवा; पारदर्शक कारभारासाठी मुख्यमंत्र्यांकडे मागणी

**दैनिक आपला विदर्भ**

**नांदेड । प्रतिनिधी** : नांदेड शहरातील दुय्यम निबंधक (रजिस्ट्री) कार्यालयांमध्ये मालमत्ता खरेदी-विक्री, दस्त नोंदणी व इतर कामांसाठी दररोज मोठ्या संख्येने नागरिक येत असतात. मात्र, कार्यालय परिसरात अनधिकृत दलालांचा वावर असल्याने नागरिकांना शासकीय प्रक्रिया समजून घेण्यासाठी तसेच आपली कामे करून घेण्यासाठी मध्यस्थांवर अवलंबून राहावे लागत असल्याच्या तक्रारी आहेत. त्यामुळे शासनाच्या पारदर्शक व नागरिकाभिमुख प्रशासनाच्या उद्देशाला बाधा निर्माण होण्याची शक्यता आहे.

या पार्श्वभूमीवर अर्घं न्यूजचे संपादक सय्यद मुनीरुद्दीन पि. सय्यद जियाउद्दीन यांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मा. देवेंद्र फडणवीस यांना निवेदन देऊन नांदेड येथील संबंधित रजिस्ट्री कार्यालयांमध्ये तातडीने लक्ष घालून आवश्यक कार्यवाही करण्याची मागणी केली आहे.

निवेदनात दुय्यम निबंधक कार्यालय क्रमांक १, २ व ३ तसेच तालुक्यातील संबंधित दुय्यम निबंधक कार्यालयांमध्ये अनधिकृत दलालांचा वावर पूर्णपणे बंद करण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच कार्यालयात केवळ अधिकृत कर्मचारी, पत्रकार व नियमानुसार अधिकृत व्यक्तींनाच प्रवेश देण्यात यावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

याशिवाय नोंदणीसाठी लागणारे मुद्रांक शुल्क व नोंदणी फी केवळ अधिकृत मुद्रांक विक्रेत्यांमार्फतच स्वीकारण्यात यावी. नागरिकांना आवश्यक कागदपत्रे, शासकीय शुल्क व नोंदणी प्रक्रियेची संपूर्ण माहिती कार्यालयात स्पष्टपणे प्रदर्शित करण्यात यावी, अशीही मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

प्रत्येक कार्यालयात नागरिकांसाठी स्वतंत्र हेल्प डेस्क सुरू करावा, तसेच कार्यालय परिसरातील आवश्यक ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसवून नियमित देखरेख ठेवावी, अशी मागणी करण्यात आली आहे. दलाली, आर्थिक गैरव्यवहार किंवा नागरिकांची फसवणूक होत असल्याचे आढळल्यास संबंधितांवर नियमानुसार कठोर कारवाई करण्यात यावी, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

नागरिकांना कोणत्याही मध्यस्थाशिवाय थेट, सुलभ आणि पारदर्शक सेवा मिळावी यासाठी विशेष उपाययोजना करण्यात याव्यात, अशी विनंती करण्यात आली आहे.

तसेच नांदेड येथील दुय्यम निबंधक कार्यालय नवीन इमारतीमध्ये स्थलांतरित होणार असल्याने फक्त दस्तलेखक व मुद्रांक विक्रेत्यांना नवीन कार्यालयात जागा देण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. दुय्यम निबंधक कार्यालय क्रमांक १, २ व ३ तसेच तालुक्यातील कार्यालयांच्या परिसरातील भू-माफियांकडून रिकाम्या प्लॉटवर कब्जा करून त्यावर बेकायदेशीरपणे व्यवहार केले जात असल्याच्या तक्रारींचाही निवेदनात उल्लेख करण्यात आला आहे.

सदर नोंदणी केलेले दस्त घेणार किंवा देणार यांचा आधार कार्डचा तपास करून त्यांची सत्यता पडताळल्यानंतरच दस्त नोंदणी करण्यात यावी. याबाबत संबंधित मुद्रांक जिल्हाधिकारी यांच्याशी चर्चा करून योग्य मार्ग काढण्यात यावा, अशी मागणीही करण्यात आली आहे.

नांदेड जिल्ह्यातील सर्वसामान्य नागरिकांच्या हितासाठी या प्रकरणाची तातडीने दखल घेऊन संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक कार्यवाहीचे आदेश द्यावेत, अशी मागणी निवेदनाच्या शेवटी करण्यात आली आहे.

## नागपूर पदवीधर मतदारसंघ परत मिळवण्यासाठी भाजपाची मोठी मोर्चेबांधणी; प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण मैदानात

**दैनिक आपला विदर्भ**

**नागपूर । प्रतिनिधी** : पदवीधर निवडणुकीसाठी भाजपानं आत्तापासून मोर्चेबांधणी करण्यास सुरुवात केलीय. भाजपा प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण आज नागपूर आणि गडचिरोलीचा दौरा करत आहेत. त्यांनी पदवीधर निवडणुकीच्या अनुषंगानं पक्षातील कार्यकर्त्यांच्या बैठका घेण्यास सुरुवात केलीय. अद्याप काँग्रेस पक्षाचे विद्यमान आमदार अभिजीत वंजारी यांचा कार्यकाळ संपायला ४ महिन्यांचा कालावधी शिल्लक असताना भाजपानं मोर्चेबांधणीला सुरुवात केलीय.

नागपूर पदवीधर मतदारसंघामध्ये नागपूर, वर्धा, भंडारा, गोंदिया, गडचिरोली आणि चंद्रपूर अशा सहा जिल्ह्यांचा समावेश होतो. मतदार नोंदणी अंतिम टप्प्यात आलीय. त्यामुळेच जास्तीत जास्त पदवीधर मतदारांना भाजपाच्या संपर्कात आणणं, मतदार यादीतील नोंदणीची स्थिती तपासणं, आगामी निवडणुकीसाठी बूथ निहाय संघटनात्मक रचना मजबूत करण्यावर भाजपाचा भर असल्याचं दिसून येतंय.

रवींद्र चव्हाण आज नागपुरात म्हणाले, की ''गेल्या काही वर्षात भाजपाच्या पदाधिकाऱ्यांनी मतदार नोंदणीकडं गांभीर्यानं लक्ष दिलंय. सध्या मतदार नोंदणीचा अंतिम टप्पा असल्यानं कार्यकर्त्यांशी संवाद साधण्यात येणार आहे, तर पुढील मतदार नोंदणी व पक्षाची संघटनात्मक रचना कशी असावी, याबाबत सर्व जिल्हाध्यक्ष, लोकप्रतिनिधी आणि प्रमुख पदाधिकाऱ्यांच्या सोबत दोन दिवस बैठकांचं आयोजन करण्यात आलंय.नागपूर विभाग पदवीधर मतदारसंघाचे विद्यमान आमदार अभिजीत वंजारी यांचा कार्यकाळ ६ डिसेंबर २०२६ रोजी संपणार आहे. निवडणूक आयोगाकडून मतदार यादीची तयारी सुरू झालीय. नागपूर विभाग पदवीधर मतदारसंघात नागपूरसह वर्धा, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर आणि गडचिरोली भागातील पात्र पदवीधर मतदारांचा समावेश होतो. त्यामुळे या निवडणुकीत मोठ्या भौगोलिक क्षेत्रातील मतदारांपर्यंत पोहोचण्याचं आव्हान राजकीय पक्षांसमोर असणार आहे.

## एअर ऑफिसर कमांडिंग-इन-चीफ, मेंटेनेंस कमांड यांनी घेतली महाराष्ट्राच्या माननीय राज्यपालांची भेट

**दैनिक आपला विदर्भ**

**नागपूर। प्रतिनिधी** : भारतीय वायुसेनेच्या 'मेंटेनन्स कमांड'चे एअर ऑफिसर कमांडिंग-इन-चीफ एअर मार्शल यल्ला उमेश, तडच, झहऊ यांनी ११ ऑगस्ट २०२६ रोजी महाराष्ट्राचे माननीय राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांची राजभवनात भेट घेतली.

या भेटीदरम्यान, एअर मार्शल उमेश यांनी माननीय राज्यपालांना, भारतीय वायु दलाच्या 'मेंटेनन्स कमांड' अर्थात देखभाल विभागाच्या भूमिकेचे महत्व विषद केले. ही कमांड, देखभाल, दुरुस्ती, पुरवठा साखळी सहाय्य, आणि स्वदेशीकरण उपक्रमांच्या माध्यमातून भारतीय वायु दलाची परिचालन क्षमता टिकवून ठेवण्याचे काम करते. त्यासोबतच, संरक्षण क्षेत्रातील भारताची आत्मनिर्भरता आणि भारतीय वायुदलाची निरंतर कार्यान्वयीन क्षमता सुनिश्चित करण्यात या कमांडने दिलेल्या महत्वाचे योगदान त्यांनी अधोरेखित केले. 'आत्मनिर्भर भारत' या संकल्पनेला पाठबळ देण्यासाठी भारतीय वायु दल करत असलेल्या प्रयत्नांबाबतची चर्चा करण्याची संधी या बैठकीच्या निमित्ताने प्राप्त झाली. तसेच, या भेटीदरम्यान, नागरी-लष्करी सहकार्य आणि राष्ट्रनिर्माणातील भारतीय वायु दलाचे योगदान यांसारख्या परस्पर हिताच्या मुद्द्यांवरही चर्चा करण्यात आली. एअर ऑफिसर कमांडिंग-इन-चीफ, मेंटेनेंस कमांड यल्ला उमेश यांनी, ४ ऑक्टोबर रोजी मुंबईत आयोजित करण्यात येणाऱ्या 'सेखों इंडियन एअर फोर्स मॅरेथॉन'च्या नियोजनाबाबत राज्यपालांना माहिती दिली.

# घोटाळेबाज संजय राऊतांनी आधी साडेनऊ हजार कोटींचा हिशेब द्यावा भाजपा प्रदेश मुख्य प्रवक्ते नवनाथ बन यांनी ओढला आसूड

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई । प्रतिनिधी** : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात गडचिरोलीचा विकास होत आहे. तेथे स्टील हब निर्माण करण्याचे काम सुरु आहे. स्थानिक आदिवासी बांधवांना मोठ्या प्रमाणावर रोजगार दिला जातोय. आरोग्य सुविधा, चांगले रस्ते, सुसज्ज इमारती उभ्या राहत आहेत आणि राज्य सरकारने तेथे मोठ्या प्रमाणात गुंतवणूक केली. पैसे कसे खायचे, हे जनाब संजय राऊत यांनाच जास्त माहिती आहे. अडीच वर्ष महाविकास आघाडीचे सरकार असताना रोज शंभर कोटी रुपये या हिशेबाने कमावलेल्या साडेनऊ हजार कोटींचा हिशेब त्यांनी द्यावा. पत्राचाळीत, खिचडी घोटाळ्यात, कामगारांचे शोषण करून त्यांचे पैसे खाणाऱ्या संजय राऊत यांनी भ्रष्टाचारावर बोलू नये, असा प्रहार भाजपा प्रदेश मुख्य प्रवक्ते नवनाथ बन यांनी बुधवारी केला. भाजपा प्रदेश



कार्यालयातील पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी काल मंत्रिमंडळाच्या बैठकीत आदेश देत गडचिरोलीतील आश्रमशाळेची मान्यता रद्द केली आहे. दोषींवर कारवाई करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. स्वत: आदिवासी विकासमंत्री तेथे जाऊन पुढच्या कारवाईचे आदेश देणार आहेत. ही आश्रमशाळा चालवणारे मारुतराव कोवासे हे काँग्रेसचे तीनवेळा आमदार आणि एकदा खासदार होते. सरकार या शाळांना अनुदान देते. परंतु ते अनुदान खर्च करण्याची जबाबदारी संस्थाचालकांवर असते. त्यात चुकीचे झाल्यानंतर सरकार कारवाई करते. संजय राऊत, तीन विद्यार्थिनींचा जीव गेला. या प्रकरणात तुम्ही राहुल गांधींना, काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांना जाब विचारणार आहात का, असा सवाल श्री. बन यांनी उपस्थित केला.

शिवसेना कुणाची याचा निकाल जनतेच्या न्यायालयात लागलाय आणि, खरी शिवसेना एकनाथजी शिंदे यांचीच आहे. खरी शिवसेना वंदनीय बाळासाहेब ठाकरे यांचे विचार पुढे घेऊन जाणाऱ्यांची असल्याचा कौल जनतेने दिला आहे. एकदा सर्वोच्च न्यायालयाने जर का या चिन्हावर शिक्कामोर्तब केले तर न्यायालयाच्या विरोधात बोलू नका. कारण निवडणूक आयोगाने तुमच्याविरोधात निकाल दिला की, निवडणूक आयोग दलाल होतो. न्यायालयाने तुमच्याविरोधात एखादा निर्णय दिला की, न्यायालयाला दुषणे दिली जातात. आज सर्वोच्च न्यायालयाचे कौतुक करतात आणि उद्या निकाल आल्यानंतर लगेच खडे फोडायला सुरुवात करता. ही डबल ढोलकी संजय राऊत यांची आहे, या शब्दात श्री. बन यांनी त्यांना फैलावर घेतले.

काल संसदेमध्ये कोण घाबरले, हे देशाने पाहिल्याचे सांगून श्री. बन म्हणाले, अमितभाई शाह संसदेत आले आणि राहुल गांधींनी संसदेपासून पळ काढला. राहुल गांधी लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीतही पळून गेले होते. पंधरा दिवसांपूर्वीही ते कुठेतरी परदेशात कुणासोबत तरी पळून गेल्याचे या देशाने पाहिले आहे. त्यामुळे पळपुटा कोण आहे आणि प्रश्नांना सामोरे जाणारे कोण आहेत, हे देशाला माहित आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदीजी, अमितभाईंचे नेतृत्व देशाने स्वीकारले. संसदेमध्ये उत्तर देण्याची अमितभाईंची तयारी आहे, पण राहुल गांधींची उत्तरे ऐकायची तयारी नाही. संजय राऊत, विनाकारण अमितभाईंच्या नावाने ओरडण्यापेक्षा राहुल गांधींना लोकसभेत बसायला सांगा. तुमच्या प्रत्येक प्रश्नाचे उत्तर देऊन तुमचे तोंड बंद करण्यासाठी अमितभाई सक्षम आहेत.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# एन. चंद्रशेखरन यांचा टाटा सन्सच्या अध्यक्षपदाचा राजीनामा; फेब्रुवारीपर्यंत पदभार सांभाळणार

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई । प्रतिनिधी :** टाटा सन्सबाबत एक मोठी बातमी समोर आली आहे. टाटा सन्सचे अध्यक्ष एन. चंद्रशेखरन यांनी आज १२ ऑगस्ट २०२६ रोजी आपल्या पदाचा राजीनामा दिलाय. या वर्षी फेब्रुवारीमध्ये टाटा सन्सच्या मंडळाने (बोर्डाने) त्यांना अध्यक्ष म्हणून पुन्हा नियुक्त करण्याचा निर्णय पुढे ढकलला होता. १८ ऑगस्ट रोजी टाटा सन्सची वार्षिक सर्वसाधारण सभा होणार असल्याने ही बातमी विशेष महत्त्वाची ठरते.

**तात्काळ पद सोडणार नाहीत :** मिळालेल्या माहितीनुसार, ते तात्काळ पद सोडणार नाहीत; ते त्यांचा सध्याचा कार्यकाळ पूर्ण करतील, जो फेब्रुवारी २०२७ पर्यंत आहे. एन. चंद्रशेखरन २०१७ पासून टाटा सन्सचे अध्यक्ष म्हणून कार्यरत आहेत. त्यापूर्वी ते टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस (ऊणए) चे सीईओ होते. ते १९८७ मध्ये टाटा समूहात रुजू झाले होते.

**चंद्रशेखरन यांच्या कार्यकाळाबाबत**



**मतभेद :** चंद्रशेखरन यांच्या पुढील कार्यकाळाबाबत टाटा सन्स आणि टाटा ट्रस्ट्स यांच्यात मतभेद निर्माण झाले होते. त्यांना अध्यक्ष म्हणून पुन्हा नियुक्त करण्याचा निर्णय या वर्षी फेब्रुवारीमध्ये पुढे ढकलण्यात आला होता. टाटा ट्रस्ट्सचे अध्यक्ष नोएल टाटा यांनी त्यांच्या पुनर्नियुक्तीला विरोध केला होता. वृत्तानुसार, नोएल टाटा यांना अशी खात्री करायची होती की टाटा सन्स भविष्यात कधीही शेअर बाजारात सूचीबद्ध (लिस्ट) होणार नाही; मात्र चंद्रशेखरन या अटीशी सहमत नव्हते. मंडळातील प्रतिनिधित्वाबाबतही दोन्ही पक्षांमध्ये मतभेद निर्माण झाले होते.

कंपनीच्या १८ ऑगस्ट रोजी होणाऱ्या वार्षिक सर्वसाधारण सभेत (अउश) चंद्रशेखरन यांची संचालक मंडळावर पुन्हा निवड करण्याबाबत मतदान होणार आहे. जर ते संचालक राहिले नाहीत, तर अध्यक्षपद टिकवून ठेवणे कठीण होऊ शकते. हे लक्षात घेण्यासारखे आहे की, रतन टाटा यांच्या निधनानंतर टाटा ट्रस्ट्स आणि टाटा सन्स यांच्यातील शेअर्सची मालकी आणि मतदानाच्या अधिकारांबाबत कायदेशीर गुंतागुंत निर्माण झाली आहे. एका बाजूला, टाटा सन्सच्या मंडळाला चंद्रशेखरन यांना पाच वर्षांची मुदतवाढ द्यायची होती, परंतु नोएल टाटा यांनी समूहाच्या ६५ वर्षांच्या निवृत्ती वयाच्या धोरणाचा हवाला देत केवळ दोन वर्षांच्या कार्यकारी कार्यकाळाची बाजू मांडली होती.

**एन. चंद्रशेखरन यांचं निवेदन :** टाटा सन्सचे अध्यक्ष श्री. एन. चंद्रशेखरन यांनी एक निवेदनही प्रसिद्ध केलंय. टाटा समूहातील माझ्या व्यावसायिक कारकिर्दीला ४० वर्षे पूर्ण झाली आहेत. या प्रतिष्ठित संस्थेमध्ये योगदान देण्याची अत्यंत समाधानकारक संधी मिळाल्याबद्दल मी कृतज्ञ आहे. गेल्या दशकात टाटा सन्सचे नेतृत्व करणे हा माझ्यासाठी मोठा सन्मान आणि एक मोठी जबाबदारी होती. टाटा सन्सचे अध्यक्ष म्हणून माझा सध्याचा कार्यकाळ २० फेब्रुवारी २०२७ रोजी संपत आहे.

**माझा पुढील कार्यकाळ पाच वर्षांनी वाढवण्याचा ठराव आणि शिफारस :** सर दोराबजी टाटा ट्रस्ट आणि सर रतन टाटा ट्रस्ट यांनी एकमताने माझा पुढील कार्यकाळ पाच वर्षांनी वाढवण्याचा ठराव आणि शिफारस केली होती; या शिफारशीची नोंद टाटा सन्सच्या 'नामांकन आणि मोबदला समिती'ने तसेच संचालक मंडळाने घेतली होती. त्यानंतर २४ फेब्रुवारी २०२६ रोजी टाटा सन्सच्या संचालक मंडळासमोर हा प्रस्ताव मांडण्यात आला. मात्र, हा प्रस्ताव मंजूर होऊ शकला नाही, कारण एका संचालक मंडळाच्या सदस्याने त्याला पाठिंबा दिला नाही आणि एकमताचा पाठिंबा नसल्यामुळे मी हा निर्णय पुढे ढकलणे पसंत केले.

**समूहाचे नेतृत्व करण्यासाठी योग्य नेता असणे आवश्यक :** त्या संचालक मंडळाच्या बैठकीला आता ६ महिने उलटून गेले आहेत आणि आजतागायत यावर कोणताही निर्णय झालेला नाही. टाटा सन्स ही एक अतिशय मोठी संस्था आहे आणि अनेक धोरणात्मक प्रकल्प सध्या अंमलबजावणीच्या अत्यंत महत्त्वाच्या टप्प्यावर आहेत. २० फेब्रुवारी २०२७ नंतर समूहाचे नेतृत्व करण्यासाठी योग्य नेता असणे केवळ आवश्यकच नाही, तर कर्मचारी, गुंतवणूकदार, भागीदार आणि इतर संबंधित घटकांसाठी नेतृत्वाबाबत स्पष्टता असणेही तितकेच महत्त्वाचे आहे. या परिस्थितीत आज मी टाटा सन्सच्या संचालक मंडळाला कळवले आहे की, २० फेब्रुवारी २०२७ रोजी माझा कार्यकाळ संपल्यावर मी पुन्हा नियुक्तीसाठी स्वत:चे नाव पुढे न करण्याचा निर्णय घेतला आहे. योग्य प्रकारे नेतृत्व हस्तांतरण सुनिश्चित करण्यासाठी मी संचालक मंडळाला उत्तराधिकाराबाबत लवकर निर्णय घेण्याची विनंती केली आहे.

## महत्त्वाचे...

### हात-पाय बांधलेल्या अवस्थेत विहिरीत महिलेचा मृतदेह, संशयित ताब्यात

दैनिक आपला विदर्भ

**नाशिक । प्रतिनिधी :** नाशिकच्या सिन्नर तालुक्यात धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. तालुक्यातील दोडी बु. येथे चार दिवसांपासून बेपत्ता असलेल्या ४५ वर्षीय महिलेचा मृतदेह नारळाच्या बागेतील विहिरीत आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. संगीता मधुकर जाधव असे मृत महिलेचे नाव आहे. दरम्यान, आता या घटनेला धक्कादायक वळण मिळाले आहे. महिलेचा खून करून हात-पाय बांधून मृतदेह विहिरीत फेकल्याचे पोलिस तपासात समोर आले आहे. या प्रकरणी अनिल शरद पगारे (१८), रा. दोडी बुद्रुक या संशयिताला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. आणखी एक संशयित पसार असून, त्याचा शोध सुरू आहे.

नेमकं काय घडलं ?

७ ऑगस्ट पासून संगीता या बेपत्ता होत्या. नातेवाईकांनी संगीता यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला मात्र, त्यांचा मोबाईल बंद होता, सोबतच घरी कुलूप असल्याचे आढळल्यानंतर नातेवाईकांनी परिसरात त्यांचा शोध सुरू केला. संगीता यांचा शोध लागत नसल्याने अखेर नातेवाईकांनी ८ ऑगस्ट रोजी संगीता जाधव बेपत्ता असल्याची तक्रार पोलिसांत दाखल केली. ९ ऑगस्ट रोजी नातेवाईकांनी दोडी बु. परिसरात पुन्हा शोधमोहीम सुरू केली. शोध घेत असताना गावातीलच एका नारळाच्या बागेतील विहिरीत त्यांचा मृतदेह आढळून आला होता. या घटनेनं परिसरात खळबळ उडाली असून, संशयितांना तातडीने अटक करण्याच्या मागणीसाठी कुंभार समाजाच्या संघटनेने सोमवारी जिल्हा रुग्णालयासमोर रास्ता रोको आंदोलन देखील केले. तसेच वावी पोलिस ठाण्यातही निवेदन दिले.

जिल्हा पोलिस अधीक्षक डॉ. डी. एस. स्वामी यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखा आणि वावी पोलिसांनी संयुक्तपणे तपास सुरू केला. तपासादरम्यान निफाड तालुक्यातून अनिल पगारे याला ताब्यात घेण्यात आले आहे. त्याच्यासोबत असलेल्या दुसऱ्या संशयिताचा शोध पोलिसांकडून घेतला जात आहे. उपविभागीय पोलिस अधिकारी के. के. पाटील, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक राहुल मोरे, उपनिरीक्षक सुदर्शन बोडके, वावीचे सहाय्यक पोलिस निरीक्षक आशिष शेळके आणि पोलिस हवालदार शहाजी शिंदे यांच्या पथकाकडून तपास सुरू आहे.

### जालना जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा! राज्यस्तरीय बँडी रोलर आईस हॉकी स्पर्धेत जालना जिल्ह्यातील खेळाडूंची नेत्रदीपक कामगिरी!

दैनिक आपला विदर्भ

**जालना । प्रतिनिधी :** पुणे येथे आयोजित राज्यस्तरीय बँडी रोलर आईस हॉकी स्पर्धेत जालना जिल्ह्यातील उदयोन्मुख खेळाडूंनी आपली मोहोर उमटवली आहे. महाराष्ट्र राज्यातील संपूर्ण जिल्ह्यांमधून २०० खेळाडू सहभागी झालेल्या स्पर्धकांमध्ये जालना जिल्ह्याच्या खेळाडूंनी अतिशय उत्कृष्ट कामगिरी करत विविध गटात पदके मिळवली आहेत.

या स्पर्धेतील ८ ते १० वयोगटतील राघव साळुंके, साद बागवान, स्वस्ति पांडे, अनाया गिरी यांनी सुवर्ण पदक पटकाविले. १४ वयोगटाती मुले - रिदम रुपडा, कयान बुरुंदिया, इब्राहिम सिद्दिकी, एकनाथ अग्रवाल, दिवेश बोथरा, अजर अली शेख यांनी रौप्य पदक पटकाविले व १० वयोगट मुले-अद्वेत पेंढारे, शिवराज खताडे यांनी कांस्य पदक पटकावले.

तसेच हर्षवर्धन सोनकांबळे, मोहम्मद रेहान खान या खेळाडूंच्या प्रशस्तीपत्र देऊन या यशाबद्दल जिल्हा क्रीडा अधिकारी नरेंद्र पवार, बँडी असोसिएशन ऑफ जालनाचे अध्यक्ष अरविंद देशमुख, उपाध्यक्ष मोहम्मद नजीब, अमजद पठाण, विष्णू पेंढारे आणि आमिर अहमद शेख यांनी अभिनंदन केले आहे. या सर्व खेळाडूंना प्रशिक्षक निसार सय्यद यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. जालना जिल्ह्यासाठी ही अत्यंत अभिमानास्पद बाब आहे.

### जयसिंगपुरमध्ये ९ लाख ११ हजार ६२० रुपयांची वीजचोरी उघड; पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल

दैनिक आपला विदर्भ

**कोल्हापूर । प्रतिनिधी :** महावितरण जयसिंगपूर विभागांतर्गत एका खडी केंद्राची मोठी वीजचोरी उघडकीस आली आहे. या खडी केंद्र ग्राहकाने स्मार्ट वीजमीटरला छेडछाड करुन ४३,६३८ युनिटची वीजचोरी केली आहे. या वीजचोराला चोरी केलेल्या विजेपोटी ९ लाख ११ हजार रुपये तर तडजोड आकारापोटी २० लाख रुपये दंड आकारण्यात आला असून, याप्रकरणी जयसिंगपूर पोलिस ठाण्यात भारतीय विद्युत अधिनियम २००३ मधील कलम १३५ अन्वये पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या स्मार्ट कारवाईने वीजचोरांमध्ये खळबळ माजली आहे.

२० जुलै रोजी महावितरणच्या पथकाने संभाजीपूर, ता. शिरोळ येथील मे. गणेश क्रश सॅण्ड कंपनी या ग्राहकाच्या वीजजोडणीची तपासणी केली.

## कुर्ल्यातील भूस्खलनात ६ जणांचा मृत्यू; कायम स्वरूपी पुनर्वसनासाठी पाठपुरावा करणार – अहिर

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई । प्रतिनिधी :** कुर्ल्यातील चिराग नगर परिसरातील गौशिया चाळीजवळ मध्यरात्रीच्या सुमारास झालेल्या भूस्खलनाच्या दुर्घटनेत ६ जणांचा मृत्यू झाला आहे. या घटनेची विधान परिषदेचे उपसभापती सचिन अहिर यांनी घटनास्थळी जाऊन पाहणी केली. बचावकार्य अद्याप सुरू असून ढिगाऱ्याखाली आणखी काही जण अडकले असण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.



घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दल, मुंबई महापालिका आणि स्थानिक प्रशासनाच्या पथकांनी घटनास्थळी धाव घेत बचावकार्य सुरू केले. अहिर यांनी घटनास्थळी पाहणी करत बचावकार्याचा आढावा घेतला. त्यांच्या उपस्थितीत एका व्यक्तीला ढिगाऱ्याखालून सुरक्षित बाहेर काढण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली. तसेच आणखी २ जण ढिगाऱ्याखाली अडकले असण्याची शक्यता असल्याचे सांगण्यात आले.

या दुर्घटनेनंतर प्रशासनाने मदतकार्याला वेग दिला आहे. मृतांच्या कुटुंबीयांना दिलासा देण्यासाठी त्यांच्या बँक खात्यात प्रत्येकी ४ लाख रुपयांची मदत जमा करण्याचे निर्देश देण्यात आल्याची माहिती सचिन अहिर यांनी दिली. याशिवाय मुख्यमंत्री मदत निधीतूनही पीडित कुटुंबांना अतिरिक्त आर्थिक मदत मिळवून देण्यासाठी पाठपुरावा करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

कुर्ल्यातील रहिवाशांना सुरक्षित आणि कायमस्वरूपी निवारा मिळणे आवश्यक असल्याचे अहिर यांनी स्पष्ट केले. या परिसरातील नागरिकांच्या पुनर्वसनाचा प्रश्न कायमस्वरूपी सोडवण्यासाठी राज्य सरकारकडे पाठपुरावा करण्यात येणार आहे. यासाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी चर्चा केली जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

या भागातील पुनर्वसनाचे प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्यासाठी शिवशाही पुनर्वसन प्रकल्पाला पुन्हा गती देण्याची मागणीही केली जाणार आहे. भविष्यात भूस्खलनासारख्या दुर्घटना टाळण्यासाठी आवश्यक उपाययोजना करणे आणि धोकादायक ठिकाणी राहणाऱ्या नागरिकांना सुरक्षित स्थळी हलवणे गरजेचे असल्याचे अहिर यांनी म्हटले.

दरम्यान, दुर्घटनेनंतर परिसरात मदत आणि बचावकार्य सुरू असून प्रशासनाकडून परिस्थितीवर लक्ष ठेवले जात आहे.

## ठाकरेंना मुख्यमंत्री होऊ देऊ नका म्हणून राऊतांनी घेतली होती आमदारांची बैठक, शिंदेसेनेच्या नरेश म्हस्केंचा गौप्यस्फोट

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई । प्रतिनिधी :** ठाकरेंना मुख्यमंत्री होऊ देऊ नका म्हणून संजय राऊतांनी पवईमधील हॉटेलवर आमदारांची बैठक घेतली होती, असा गौप्यस्फोट शिंदेसेनेचे खासदार नरेश म्हस्केंनी केला आहे. खासदारकीसाठी नाव जाहीर करण्यास उशीर होत असल्यामुळे राऊतांनी उद्धव आणि रश्मी ठाकरेंनी शिव्या दिल्याचा आरोपही म्हस्केंनी केला. राऊतांनी मुख्यमंत्री व्हायचं होतं. एकनाथ शिंदेंना मुख्यमंत्री करण्याबाबत चर्चा झाली झाली होती. पण, उद्धव ठाकरेंचे नाव पुढे करण्यामागे राऊतांचा कट होता, असाही आरोप म्हस्केंनी माध्यमांशी बोलताना केला.

राज्यसभेसाठी नाव लवकर जाहीर केले जात नव्हते त्यावेळी राऊत उद्धव ठाकरे यांच्यासह रश्मी ठाकरेंना देखील शिव्या देत होते, असा आरोप नरेश म्हस्केंनी केला. ''राज्यसभेसाठी तिकीट जाहीर केले जात नव्हते, उशीर होत होता तेव्हा राऊत उद्धव ठाकरे सोडाच रश्मी ठाकरेंना देखील किती शिव्या देत होते हे अख्ख्या शिवसेनेला माहिती आहे. उद्धव ठाकरे मुख्यमंत्री झाले आणि स्वत:च्या भावाला मंत्री केलं नाही. उद्धव ठाकरे मंत्रालयात जात नाहीत त्यावेळी शिवसेनेच्या आमदारांना पवईच्या हॉटेलमध्ये बैठक घ्यायला लावली. उद्धव ठाकरेंना विरोध करा आणि माझं नाव मुख्यमंत्री म्हणून घ्या यासाठी कोण कुभांड रचत होतं? हे अख्ख्या शिवसेनाला माहिती आहे'', असे म्हस्के म्हणाले.

फुटीवेळी काय घडलं?

एकनाथ शिंदेंच्याबरोबर जाणारा पहिला शिवसैनिक ते



असल्याचे म्हस्के म्हणाले. शिंदेंच्या बंडखोरीनंतर उद्धव ठाकरेंनी फोन केल्याचा दावाही म्हस्केंनी केला. फोनवर मी एकनाथ शिंदेंच्या बरोबर असल्याचे सांगितले होते असेही म्हस्के पुढे म्हणाले. एकनाथ शिंदेंवर अन्याय होतोय आणि त्यांच्याशी चर्चा करण्याची भूमिका देखील मांडल्याचा खुलासा त्यांनी केला. एकनाथ शिंदेंनी वेगळी भूमिका घेतली तर नरेश म्हस्के देखील त्यांच्याबरोबर जातील त्यामुळे त्यांना विधानपरिषदेची तिकीट द्यायचं नाही हे राऊतांनी अयोध्येत एकनाथ शिंदेंच्या समक्ष सांगितल्याचा दावा म्हस्केंनी केला. कितीही टीका केली तर मी शिंदेंबरोबर राहणार असल्याचेही म्हस्केंनी स्पष्ट केले.

म्हस्केंची राऊतांवर टीका

खूप पत्रं आहेत असं तुम्ही म्हणता, एक जरी पत्र असेल तर तुम्ही राजीनामा द्या, नाहीतर मी देतो. वरिष्ठ नेते म्हणून आम्ही तुमचा आदर करतो. आमची बंद मूठ बंद राहुद्या, असा इशारा नरेश म्हस्केंनी दिला. शिंदेंनी घेतलेल्या भूमिकेनंतर राऊत रोज फोन करत होते, असेही म्हस्के यावेळी म्हणाले. संजय राऊत फेकूचंद आहेत, भोंगा या शब्दाची निर्मिती मी केली आहे. त्यामुळे त्यांचा माझ्यावरचा राग समजू शकता, अशी टीका म्हस्केंनी केली. राऊतांना पक्ष काँग्रेसबरोबर घेऊन जायचा आहे, या पक्षाचे वाटोळे केले, अशी टीका म्हस्केंनी केली.

## श्रीलंकेनंतर भारत आणि अफगाणिस्तानमध्ये रंगणार टी-२० मालिका; संपूर्ण वेळापत्रक जाहीर

दैनिक आपला विदर्भ

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था :** अफगाणिस्तान क्रिकेट बोर्डाने सप्टेंबरमध्ये भारताविरुद्ध तीन सामन्यांची टी-२० आंतरराष्ट्रीय मालिका खेळण्याची घोषणा केली आहे. ही संपूर्ण मालिका नवी दिल्लीतील अरुण जेटली स्टेडियमवर आयोजित करण्यात येणार असून अफगाणिस्तान यजमानाची भूमिका बजावणार आहे. मालिकेतील तीनही सामने रविवार, १३ सप्टेंबर, मंगळवार, १५ सप्टेंबर आणि गुरुवार, १७ सप्टेंबर रोजी खेळवले जाणार आहेत. एसीबीच्या माहितीनुसार, भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) या तारखा आणि ठिकाणाला सहमती दर्शवली आहे.

अफगाणिस्तान पहिल्यांदाच भारतीय भूमीवर भारताविरुद्ध द्विपक्षीय मालिकेचे यजमानपद भूषवणार आहे. यापूर्वी अफगाणिस्तानने भारताला आपले होम ग्राउंड बनवून लखनऊ, देहरादून आणि ग्रेटर नोएडा येथे इतर देशांविरुद्ध सामने आयोजित केले आहेत. मात्र, भारतालाच आपला प्रतिस्पर्धी मानून भारतातील होम ग्राउंडवर मालिका खेळण्याची अफगाणिस्तानची ही पहिलीच वेळ असेल. अफगाणिस्तान क्रिकेट बोर्डाचे मुख्य कार्यकारी अधिकारी नसीब खान यांनी बोर्डाच्या व्यावसायिक भागीदारांना पाठवलेल्या अधिकृत पत्रातून या दौऱ्याची पुष्टी केली आहे. या पत्रात त्यांनी १३ ते १७ सप्टेंबरदरम्यान भारताविरुद्ध ही मालिका खेळवली जाणार असल्याचे स्पष्ट केले आहे. दोन्ही क्रिकेट बोर्डांकडून अद्याप याबाबत सार्वजनिक स्वरूपात औपचारिक घोषणा होणे बाकी असले तरी एसीबीने मालिकेच्या तारखा आणि ठिकाण निश्चित केले आहे.

बांगलादेश दौऱ्याची शक्यता जवळपास संपली-

अफगाणिस्तानविरुद्धच्या मालिकेची पुष्टी झाल्यानंतर भारतीय संघाच्या बांगलादेश दौऱ्याची शक्यता जवळपास संपली आहे. बांगलादेश क्रिकेट बोर्डाने (ँ) १ ते १३ सप्टेंबरदरम्यान भारताविरुद्ध सहा पांढऱ्या चेंडूचे सामने (वनडे आणि टी-२०) खेळवण्याची योजना आखली होती. मात्र, आता अफगाणिस्तानविरुद्धच्या मालिकेच्या तारखा बांगलादेशच्या प्रस्तावित वेळापत्रकाशी जुळत आहेत. त्यामुळे भारताचा बांगलादेश दौरा रद्द होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

भारत आणि अफगाणिस्तान यांच्यातील टी-२० मालिकेचे संपूर्ण वेळापत्रक-

पहिला टी२० सामना: १३ सप्टेंबर, २०२६, नवी दिल्ली

दुसरा टी२० सामना: १५ सप्टेंबर, २०२६, नवी दिल्ली

तिसरा टी२० सामना: १७ सप्टेंबर, २०२६, नवी दिल्ली

## १५ सेकंदात ३ हल्ले आणि ४८ किमीचा अचूक पल्ला; चीन-अमेरिकाही चकित

दैनिक आपला विदर्भ

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था :** रणांगणावर भारताच्या संरक्षण क्षमतेने एक ऐतिहासिक आणि अभूतपूर्व टप्पा गाठला आहे. डीआरडीओ, भारत फोर्ज आणि टाटा यांच्या संयुक्त विद्यमाने विकसित केलेली एटीएजीएस ही स्वदेशी १५५ मिमी/५२ कॅलिबर तोफ आता भारतीय तोफखान्याची मुख्य ताकद बनली आहे. तिच्या अफाट मारक क्षमतेमुळे आणि आधुनिक तंत्रज्ञानामुळे आज संपूर्ण जगात या 'मेड इन इंडिया' शस्त्राची चर्चा होत आहे.

**काय आहे एटीएजीएसची खासियत?**

ही केवळ एक पारंपरिक तोफ नसून आधुनिक रणांगणाचा एक खराखुरा विध्वंसक आहे. या तोफेच्या २५-लिटरच्या प्रचंड चेंबरमुळे आणि पूर्णपणे स्वयंचलित दारूगोळा भरण्याच्या प्रणालीमुळे हिच्या मारक क्षमतेत कमालीची वाढ झाली आहे. या तोफेच्या वेगाची दहशत अशी आहे की, ती अवघ्या १५ सेकंदात ३ गोळ्यांचा अत्यंत वेगवान वर्षाव करू शकते. शत्रूला सावध होण्याचा किंवा प्रतिहल्ला (काउंटर-बॅटरी फायर) करण्याची संधी मिळण्याआधीच हा 'बर्स्ट फायर' मोड संपूर्ण शत्रू बंकर उद्ध्वस्त करण्यास सक्षम आहे.

**काय आहे एटीएजीएसची खासियत?**


ही केवळ एक पारंपरिक तोफ नसून आधुनिक रणांगणाचा एक खराखुरा विध्वंसक आहे. या तोफेच्या २५-लिटरच्या प्रचंड चेंबरमुळे आणि पूर्णपणे स्वयंचलित दारूगोळा भरण्याच्या प्रणालीमुळे हिच्या मारक क्षमतेत कमालीची वाढ झाली आहे. या तोफेच्या वेगाची दहशत अशी आहे की, ती अवघ्या १५ सेकंदात ३ गोळ्यांचा अत्यंत वेगवान वर्षाव करू शकते. शत्रूला सावध होण्याचा किंवा प्रतिहल्ला (काउंटर-बॅटरी फायर) करण्याची संधी मिळण्याआधीच हा 'बर्स्ट फायर' मोड संपूर्ण शत्रू बंकर उद्ध्वस्त करण्यास सक्षम आहे.

**चीन आणि अमेरिकेच्या तोफांपेक्षा किती वेगळी?**

अमेरिकेची एम७७७ आणि चीनची एएच४ या तोफा वजनाने हलक्या (अनुक्रमे ४.२ टन आणि ४.५ टन) असल्यामुळे हेलिकॉप्टरद्वारे उंच पर्वतीय भागात पटकन नेल्या जाऊ शकतात. या तुलनेत १८ टन वजनाची एटीएजीएस तोफ वजनाने भारी असली, तरी तिच्यात एक कमालीचे वैशिष्ट्य आहे. यात असलेल्या अंगभूत सहाय्यक पॉवर युनिट मुळे ही तोफ कोणत्याही ट्रकशिवाय खडबडीत भूभागावर ताशी १८ किलोमीटर वेगाने स्वत:हून आपली जागा बदलू शकते. लडाख आणि सिक्कीमसारख्या आव्हानात्मक भौगोलिक परिस्थिती असलेल्या सीमांवर ही यंत्रणा अत्यंत उपयुक्त ठरत आहे.

**आर्थिक बाजू आणि सैन्यात समावेश**

या अक्राळविक्राळ आणि शक्तिशाली तोफेच्या उत्पादनासाठी मोठा निधी गुंतवला गेला आहे. एका तोफेचा अंदाजे खर्च २२ कोटी ते २३ कोटी रुपये दरम्यान आहे.



भारतीय लष्करासाठी ३०७ तोफा आणि ३२७ तोफवाहू वाहनांच्या ऑर्डरची एकूण किंमत अंदाजे ६,९०० कोटी ते ७,००० कोटी रुपयांच्या घरात आहे. लडाखपासून सिक्कीमपर्यंतच्या कठीण सीमांवर तैनात झालेली ही स्वदेशी तोफ शत्रूच्या गोटात धडकी भरवत आहे. महागड्या गाईडेड मिसाइल्सशिवाय अगदी अचूक निशाणा साधणारी ही 'एटीएजीएस' तोफ खऱ्या अर्थाने नव्या आणि आत्मनिर्भर भारताची लष्करी ताकद जगासमोर सिद्ध करत आहे.

## वृत्तविशेष...

### चिल्ड्रन एड सोसायटीच्या कामकाजाचा मंत्री आदिती तटकरे यांच्याकडून आढावा

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई । प्रतिनिधी :** चिल्ड्रन एड सोसायटीचे २०२६-२०२७ हे शताब्दी वर्ष असून महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी मंत्रालयात आयोजित बैठकीत सोसायटीकडील कामकाजाचा आढावा घेतला. महिला व बालविकास मंत्री तटकरे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीस महिला व बाल विकास विभागाचे सचिव डॉ. अनुपकुमार यादव आणि संबंधित अधिकारी उपस्थित होते. मंत्री आदिती तटकरे यांनी चिल्ड्रन एड सोसायटीच्या जागेवरील अतिक्रमण तातडीने काढण्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांना निर्देश देत जागा उपलब्धेतनुसार या ठिकाणी करण्यात येणाऱ्या कामाचा सुधारित आराखडा सादर करण्याबाबतही त्यांनी सूचित केले.

या बैठकीत रिक्त पदे भरणे, कर्मचाऱ्यांच्या प्रश्नावर सकारात्मक तोडगा काढणे कार्यकारी समितीची बैठक नवीन आकृतिबंद प्रस्ताव पाठवणे यासह माटुंगा येथील कर्मचारी वसाहती मधील जागेबाबतही सविस्तर चर्चा करण्यात आली

### पारधी समाजातील सुशिक्षित बेरोजगार युवकांना व्यवसायासाठी अर्थसहाय्य

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई । प्रतिनिधी :** पारधी समाजातील सुशिक्षित बेरोजगार युवकांना स्वयंरोजगाराची संधी उपलब्ध करून देत त्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी २०२६-२७ या आर्थिक वर्षात जिल्हा वार्षिक आदिवासी घटक कार्यक्रमांतर्गत अर्थसहाय्य देण्यात येणार आहे. या योजनेंतर्गत पारधी जमातीतील सुशिक्षित बेरोजगार युवकांना त्यांच्या आवडीनुसार व कौशल्याला अनुरूप व्यवसाय सुरू करण्यासाठी आर्थिक मदत उपलब्ध करून दिली जाणार आहे.

मुंबई शहर आणि मुंबई उपनगर जिल्ह्यातील पात्र पारधी समाजातील लाभार्थ्यांनी या योजनेचा लाभ घेण्यासाठी आवश्यक कागदपत्रांसह विहित नमुन्यातील अर्ज संबंधित कार्यालयात सादर करावा. अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत ३० ऑक्टोबर २०२६ आहे. पारधी समाजातील युवकांना पारंपरिक उपजीविकेवरील अवलंबित्व कमी करून स्वयंरोजगाराच्या माध्यमातून उत्पन्नाचे शाश्वत साधन उपलब्ध करून देणे, हा या उपक्रमाचा उद्देश आहे. लाभार्थ्यांना त्यांच्या निवडीनुसार व्यवसाय सुरू करण्यासाठी अर्थसहाय्य मिळणार असल्याने युवकांनी उपलब्ध संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

योजनेचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या पात्र युवकांनी अंतिम मुदतीची प्रतीक्षा न करता आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करून अर्ज सादर करावेत. अधिक माहितीसाठी आदिवासी विकास विभाग अंतर्गत प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, मुंबई, कस्तुरबा क्रॉस रोड नं.२, कस्तुरबा महानगरपालिकेची मराठी शाळा क्र.२ सभागृह हॉल, तळमजला, बोरिवली पुर्व, मुंबई ४०००६६ यांच्याशी संपर्क साधावा.

### गटप्रवर्तकांच्या मागण्यांवर शासन सकारात्मक – आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई । प्रतिनिधी :** राज्यातील आशा गटप्रवर्तकांच्या विविध प्रश्नांबाबत शासन सकारात्मक असून, त्यांच्या मागण्यांचा सविस्तर विचार करून योग्य तो निर्णय घेण्यात येईल, अशी ग्वाही सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिली. राज्यातील सुमारे ३२०० गटप्रवर्तकांच्या मागण्यांवर सविस्तर चर्चा करण्यासाठी स्वतंत्र बैठक आयोजित करण्याचे निर्देशही त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

मुंबईत आशा गटप्रवर्तकांच्या विविध मागण्या आणि प्रश्नांबाबत आरोग्यमंत्री आबिटकर यांच्या उपस्थितीत बैठक झाली. यावेळी आमदार मनीषा कायंदे, आमदार भावना गवळी, गटप्रवर्तक तसेच संघटनेचे प्रतिनिधी प्रवीण चौधरी आणि नेत्रदीपा पाटील उपस्थित होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली राज्यातील प्रत्येक घटकाला न्याय देण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. आशासेविका, अर्धवेळ परिचर तसेच कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांबाबत शासनाने सकारात्मक भूमिका घेतली आहे. त्याच धर्तीवर गटप्रवर्तकांच्या प्रश्नांचाही सहानुभूतीपूर्वक विचार केला जाईल, असे मंत्री आबिटकर यांनी सांगितले.

आरोग्य यंत्रणेच्या माध्यमातून शासनाच्या विविध योजना आणि आरोग्यविषयक उपक्रम तळागाळापर्यंत पोहोचविण्यात आशा गटप्रवर्तकांची भूमिका महत्त्वाची आहे. नागरिकांना आरोग्यसेवा उपलब्ध करून देताना त्या आरोग्य विभाग आणि जनतेमधील महत्त्वाचा दुवा म्हणून काम करीत आहेत. त्यामुळे त्यांच्या मागण्यांबाबत शासन संवेदनशील असून, सकारात्मक निर्णय घेण्याच्या दृष्टीने आवश्यक कार्यवाही करण्यात येईल, असेही आरोग्यमंत्र्यांनी स्पष्ट केले.

# कर्जाचे पुनर्गठन केलेल्या शेतकऱ्यांनाही कर्जमुक्तीचा लाभ द्या!

## नियमित कर्ज भरणाऱ्या शेतकऱ्यांना २ लाख रुपये प्रोत्साहन अनुदान द्या

## रविकांत तुपकरांनी घेतली जिल्हाधिकाऱ्यांची भेट! अन्यथा संघर्ष अटळ रविकांत तूपकरांचा इशारा

**दैनिक आपला विदर्भ**






**बुलढाणा। प्रतिनिधी :** कर्जमाफीच्या योजनेत त्रुटी राहणार असतील, तर शेतकऱ्यांना न्याय कसा मिळणार? असा थेट सवाल उपस्थित करत शेतकरी नेते तथा क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष रविकांत तुपकर यांनी पुन्हा एकदा सरकारविरोधात आक्रमक भूमिका घेतली आहे. बँकांनी शेतकऱ्यांची परवानगी न घेता अथवा चुकीची माहिती देऊन परस्पर कर्जाचे पुनर्गठन केलेल्या शेतकऱ्यांनाही कर्जमाफीचा लाभ द्यावा, तसेच नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजारांऐवजी २ लाख रुपये प्रोत्साहनपर अनुदान द्यावे, अशी मागणी तुपकर यांनी केली आहे. याच मागण्यांसाठी तुपकर यांनी बुलढाणा जिल्हाधिकारी डॉ. प्रवीण देवरे यांची भेट घेऊन सविस्तर चर्चा केली. जिल्हाधिकाऱ्यांच्या माध्यमातून शासनाकडे याबाबत निवेदनही सादर करण्यात आले. शेतकऱ्यांच्या मागण्यांवर सकारात्मक निर्णय झाला तर सरकारसोबत आमचा संघर्ष अटळ आहे अशी प्रतिक्रिया रविकांत तुपकर यांनी माध्यमांशी बोलतांना दिली.

राज्य सरकारने जाहीर केलेल्या अहिल्यादेवी होळकर कर्जमाफी योजनेतील त्रुटींवर तुपकर सातत्याने आवाज उठवत आहेत. अनेक बँकांनी संबंधित शेतकऱ्यांची परवानगी न घेता आणि चुकीची माहिती देऊन कर्जाचे परस्पर पुनर्गठन केले. परिणामी मोठ्या संख्येने शेतकरी कर्जमाफीच्या लाभापासून वंचित राहिले आहेत.'शेतकऱ्याने कर्जाचे पुनर्गठन स्वतःहून केले नसताना त्याची शिक्षा त्याला का?' असा सवाल उपस्थित करत पुनर्गठित कर्जधारक शेतकऱ्यांचाही कर्जमाफीमध्ये तातडीने समावेश करण्याची मागणी तुपकर यांनी केली.

### नियमित कर्ज भरणाऱ्यांनी काय पाप केले?

दरम्यान, नियमितपणे कर्जाची परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना सरकारने ५० हजार रुपये प्रोत्साहनपर अनुदान देण्याची घोषणा केली आहे. मात्र, ही रक्कम अत्यंत तोकडी असून नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना २ लाख रुपये प्रोत्साहनपर अनुदान द्यावे, अशी तुपकरांची मागणी आहे. कर्ज वेळेवर फेडणाऱ्या शेतकऱ्यांनी नेमके काय पाप केले? असा सवाल उपस्थित करत, जे शेतकरी प्रामाणिकपणे कर्जफेड करतात, त्यांनाही शासनाने भरीव प्रोत्साहन द्यायला हवे, अशी भूमिका त्यांनी मांडली. याशिवाय आयटीआर भरणाऱ्या शेतकऱ्यांचा कर्जमाफीमध्ये समावेश करावा, तसेच यापूर्वीच्या तीन कर्जमाफी योजनांमधून वंचित राहिलेल्या पात्र शेतकऱ्यांनाही नव्या कर्जमुक्ती योजनेत समाविष्ट करावे, अशी मागणी करण्यात आली. कर्जमाफीच्या यादीतील त्रुटी तातडीने दूर करून प्रत्येक पात्र शेतकऱ्याला न्याय मिळावा, यासाठी प्रशासनाने शासनाकडे ठोस पाठपुरावा करावा, अशी मागणीही तुपकरांनी केली.

### 'निर्णय घ्या, अन्यथा राज्यव्यापी आंदोलन!'

शेतकऱ्यांच्या कर्जमुक्तीचा प्रश्न केवळ कागदावरील आकडेवारीचा नसून त्यांच्या भवितव्याचा प्रश्न आहे. त्यामुळे सरकारने या मागण्यांवर तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा. अन्यथा राज्यव्यापी आंदोलन उभारले जाईल, असा इशाराही रविकांत तुपकर यांनी दिला. कर्जमुक्ती योजनेतील अन्याय आणि त्रुटी दूर होईपर्यंत संघर्ष थांबणार नाही, अशी आक्रमक भूमिका घेत तुपकरांनी सरकारला पुन्हा एकदा शेतकऱ्यांच्या प्रश्नावर घेरण्याचे संकेत दिले आहेत.

यावेळी माजी जिल्हा परिषद सदस्य एकनाथ पाटील थुट्टे, जानकीदेवी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष शेनफडराव घुबे, शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष दासा पाटील कणखर, क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे युवा नेते विनायकजी सरनाईक, अमोल मोरे, प्रकाश आबा घुबे, पवन काकडे यांच्यासह शेतकरी चळवळीतील अनेक नेते व सहकारी उपस्थित होते.

## रेडिओ मिरची घेऊन येत आहे, महाराष्ट्राच्या इतिहासाचे कमाल किस्से; सुबोध भावे यांच्या आवाजात रेडिओवर रंगणार 'असा घडला महाराष्ट्र'!

**दैनिक आपला विदर्भ**

**पुणे। प्रतिनिधी :** बऱ्याचदा आपल्याला आपल्या परंपरेची, संस्कृतीची आणि वास्तुंची फक्त नावं माहीत असतात; पण त्यामागे दडलेलं अद्भूत खगोलशास्त्र, इतिहास आणि इंजिनिअरिंगचा चमत्कार मात्र माहीत नसतो! निसर्गावर मात करून बांधलेले रस्ते असोत, १३०० वर्षांपूर्वी उभारलेली मंदिरे असोत, समुद्राची छाती फाडून उभारलेले जलदुर्ग असोत, किंवा एकाच अर्कातून दोन वेगळ्या चवी जन्माला घालणारी आपली खाद्यसंस्कृती असोत, महाराष्ट्र म्हणजे केवळ जुन्या गोष्टींचा संग्रह नसून स्वाभिमान, अथांग लोककला, अवलिया माणसं आणि जगात भारी इंजिनिअरिंगचा मिलाप आहे!

महाराष्ट्र म्हणजे फक्त नकाशावर आखलेली एक सीमा किंवा काही शहरांचा समूह नाही, तर महाराष्ट्र म्हणजे एक जिवंत भावना आहे! आपण रोज ज्या ऐतिहासिक वास्तूंच्या कुशीत राहतो किंवा ज्या अस्सल संस्कृतीचा आस्वाद घेतो, त्यामागे आपल्या पूर्वजांची जिद्द आणि अद्भूत इतिहास दडलेला आहे. महाराष्ट्राची हीच समृद्ध परंपरा, स्वाभिमान आणि जगाच्या दोन पावले पुढे विचार करणारी वृत्ती पुन्हा एकदा प्रेक्षकांसमोर आणण्यासाठी टीम रेडिओ मिरची घेऊन येत आहे एक खास नवा कोरा रेडिओ शो 'असा घडला महाराष्ट्र'.

या भव्य कार्यक्रमाचे सारथ्य महाराष्ट्राचे लाडके अभिनेते सुबोध भावे करत असून, २४ ऑगस्ट २०२६ पासून हा शो प्रेक्षकांच्या भेटीस येत आहे.

महाराष्ट्राच्या ऐतिहासिक आणि प्रगत विचारशैलीच्या वारशाचा अभिमान प्रत्येक महाराष्ट्रीयन माणसाच्या मनात पुन्हा जागा करणे, हा या रेडिओ शोचा ध्यास आहे.

नुकतीच 'असा घडला महाराष्ट्र' कार्यक्रमाची पत्रकार परिषद संपन्न झाली, यावेळी अभिनेते सुबोध भावे म्हणाले,

''रेडिओ मिरची... अतिशय प्रसिद्ध रेडिओ चॅनेल, आणि अनेक वर्ष त्यांच्याबरोबर माझ्या सिनेमाच्या निमित्ताने गप्पा होत आहेत, पण आता रेडिओ मिरची वर मी गप्पा मारणार आहे माझ्या प्रेक्षकांबरोबर.आणि विषय सुद्धा आपला आवडीचा... तो म्हणजे महाराष्ट्राचा! कारण महाराष्ट्राविषयी आपल्या सगळ्यांना अभिमान आहे.

पण हा महाराष्ट्र घडला कसा? त्याच्या पाठीमागे किती लोकांचे परिश्रम होते, किती संस्थांचं त्याच्यात योगदान होतं, त्या संस्था कशा उभ्या राहिल्या, त्या संस्था घडवण्यामध्ये कोणा कोणाचा वाटा होता... हे सगळं तुमच्याबरोबर मी शेअर करणार आहे रेडिओ मिरची वरून!

आपण आपल्या आयुष्यात अनेक गोष्टी करत असतो आणि त्याची उत्तरं आपल्याकडे नसतात. कारण आपल्या कोणीतरी, आजीनं, आईनं सांगितलेलं असतं, की, ''बाळा! शनिवारी केस कापायचे नाहीत हा! पण का? अशा अनेक ऐकलेल्या गोष्टीं विषयीचं लॉजिकही तुम्हाला या कार्यक्रमातनं ऐकायला मिळणार आहे.

मला स्वत:ला खूप आनंद होतोय आणि मी खूप उत्सुक आहे की कधी एकदा हा कार्यक्रम तुमच्यासमोर रेडिओ मिरची बरोबर मी घेऊन येतोय...लवकरच!''

हा शो म्हणजे कोणतीही रटाळ किंवा कंटाळवाणी इतिहासाची तासिका नसून सुबोध भावे यांच्या ओघवत्या आणि 'महाराष्ट्रीयन-कूल' शैलीत सादर केलेली एक रंजक आणि अभिमानास्पद सफर असणार आहे.

प्रसारणाची वेळ आणि शहरे:

'असा घडला महाराष्ट्र' हा शो पुणे, नाशिक, कोल्हापूर, छत्रपती संभाजीनगर, नागपूर, अकोला आणि अमरावती या ७ शहरांमध्ये रेडिओ मिरचीवर प्रसारित केला जाईल.

प्रसारणाची वेळ: सोमवार ते शुक्रवार, संध्याकाळी ६ ते ८.

पुन:प्रसारण: शनिवार व रविवार (वेगळ्या वेळेत)

आपल्या महाराष्ट्राची खरी श्रीमंती प्रत्येक माणसापर्यंत पोहोचवण्यासाठी टीम रेडिओ मिरची पूर्णपणे सज्ज झाली आहे.

## २१ ऑगस्टला जलसंधारण दिनानिमित्त आयोजित 'महा वॉकेथॉन'मध्ये मोठ्या संख्येने सहभागी व्हा – मंत्री संजय राठोड

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई । प्रतिनिधी :** येत्या २१ ऑगस्ट रोजी संपूर्ण महाराष्ट्रात ''जलसंधारण दिन'' मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येणार असून, मुंबईतील राज्यस्तरीय मुख्य कार्यक्रमासह सर्व जिल्ह्यांच्या ठिकाणी एकाच वेळी 'महा वॉकेथॉन २०२६ – वॉक फॉर वॉटर' चे आयोजन करण्यात आले आहे. मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या हस्ते या स्पर्धेच्या लोगोचे अनावरण करण्यात आले. मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांनी या दोन्ही उपक्रमांमध्ये राज्यातील युवक-युवती आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन केले आहे, अशी माहिती मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांनी दिली.

मंत्री संजय राठोड यांनी सांगितले की, महाराष्ट्राच्या जलसंधारण क्षेत्राला दूरदृष्टी आणि व्यापक दिशा देणारे माजी मुख्यमंत्री दिवंगत सुधाकरराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त २१ ऑगस्ट हा दिवस 'जलसंधारण दिन' म्हणून साजरा करण्यात येत असून, त्यांच्या जलसंधारणविषयक योगदानाचे स्मरण करत राज्यभर विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत. यावर्षीच्या जलसंधारण दिनाचा मुख्य संदेश माती वाचवा, पाणी जपा, सुरक्षित भविष्य घडवा असा आहे.

१५ ऑगस्टपासून 'जलसंधारण सप्ताह'

१५ ऑगस्टपासून राज्यात 'जलसंधारण सप्ताह' सुरू होणार असून, २१ ऑगस्टपर्यंत शाळा, महाविद्यालये, ग्रामपंचायती, स्थानिक स्वराज्य संस्था आणि सामाजिक संस्थांच्या माध्यमातून मृद व जलसंधारण, पाणी बचत, भूजल पुनर्भरण, पावसाच्या पाण्याचे संकलन तसेच नदी-ओढ्यांच्या स्वच्छतेसंदर्भात विविध जनजागृती उपक्रम राबविण्यात येणार आहेत.

# उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत (दादा) पाटील यांनी साधला विद्यार्थ्यांशी थेट संवाद

## विद्यार्थ्यांच्या अभ्यासपूर्ण सूचनांचे केले स्वागत

**दैनिक आपला विदर्भ**






**मुंबई । प्रतिनिधी :** उच्च शिक्षणाच्या विविध योजना, शिक्षणातील पारदर्शकता, करिअर मार्गदर्शन, परीक्षा सुरक्षा आणि सामाजिक जबाबदारी अशा विविध विषयांवर विद्यापीठ व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांशी उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी थेट संवाद साधला. मंत्रालयात उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी विद्यार्थ्यांशी मनमोकळा संवाद साधला. या संवादातून विद्यार्थ्यांनी शासनाच्या योजना अधिक प्रभावीपणे तळागाळापर्यंत पोहोचविण्यासह युवकांचा धोरणनिर्मिती प्रक्रियेतील सहभाग वाढविण्यासाठी विविध अभ्यासपूर्ण सूचना मांडल्या.

विद्यार्थ्यांनी शासनाच्या विविध योजना, अनुदाने व सवलती यांची माहिती अधिक व्यापकपणे सर्वसामान्यांपर्यंत पोहोचण्याची गरज व्यक्त केली. धोरणे जाहीर झाल्यानंतर त्यांचा प्रत्यक्ष लाभ नागरिकांपर्यंत पोहचवण्यासंदर्भात विश्र्वास, पारदर्शकता आणि प्रभावी संवाद निर्माण होणे आवश्यक असल्याचे विद्यार्थ्यांनी नमूद केले. विद्यार्थ्यांनी नवीन कायदे, निर्णय किंवा शैक्षणिक धोरणांबाबत युवकांची मते जाणून घेण्यासाठी 'ओपिनियन पोल' किंवा डिजिटल अभिप्राय यंत्रणा विकसित करण्याची सूचनाही केली. शासनाच्या विविध पोर्टलवर विद्यार्थ्यांना आपली मते नोंदविता येतील, अशी अधिक सुलभ व्यवस्था असावी, असे मत चर्चेदरम्यान व्यक्त करण्यात आले.

उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी विद्यार्थ्यांच्या सूचनांचे स्वागत केले. विद्यार्थ्यांनी आपल्या अपेक्षा मनमोकळेपणे व्यक्त कराव्यात, मात्र सोबतच युवकांनी नेतृत्व घेऊन शासनाच्या उपक्रमांचा अभ्यास करावा, असे आवाहनही केले. आजच्या डिजिटल युगात उपलब्ध माहितीचा उपयोग करून महाराष्ट्र शासनाच्या योजना, उपक्रम आणि त्यांच्या लाभार्थ्यांची माहिती संकलित करून विद्यार्थ्यांनी दस्तऐवज अथवा माहितीपुस्तिका तयार करावी, अशी सूचनाही त्यांनी केली. मंत्री पाटील म्हणाले, विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष समाजात जाऊन सामाजिक प्रश्र्नांचा अनुभव घ्यावा. प्रत्येक विद्यार्थ्याने आठवड्यातून किमान एक तास सामाजिक कार्यासाठी द्यावा. या माध्यमातून विद्यार्थ्यांनी ठोस सामाजिक उपक्रम हाती घेतल्यास त्यांना आवश्यक ते सर्व सहकार्य, तसेच आर्थिक पाठबळही देण्याची शासनाची तयारी असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

संवादादरम्यान मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी उच्च शिक्षणासाठी राबवल्या जाणाऱ्या विविध सवलती व योजनांची सविस्तर माहिती दिली. प्रत्येक कॉलेजमध्ये महिला प्राध्यापकांच्या नेतृत्वाखाली 'नोडल कमिटी' स्थापन करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच व्हॉट्सप आणि डिजिटल माध्यमांतून विद्यार्थ्यांपर्यंत ही माहिती थेट पोहोचवण्याची यंत्रणाही उभारली जात असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. स्पर्धा परीक्षा आणि सीईटी परीक्षांच्या सुरक्षेबाबत विचारलेल्या प्रश्र्नावर अधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांना आश्र्वस्त केले. राज्य सरकार आणि सीईटी सेलने सुरक्षेसाठी ७३ हून अधिक बिंदू निश्र्चित केले आहेत. सायबर सुरक्षा यंत्रणांच्या मदतीने मानवी हस्तक्षेप कमी करून परीक्षा अधिक पारदर्शक आणि सुरक्षित करण्यावर भर दिला जात असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले.

विद्यार्थ्यांच्या सर्व प्रश्र्नांची समाधानकारक उत्तरे देत मंत्री चंद्रकांतदादा पाटील म्हणाले नशा मुक्ती, महाविदयालयातील विद्यार्थ्यांचे मानसिक आणि भावनिक स्वास्थ, रस्ते सुरक्षा,एकल पाल्यांच्या समस्या, NSS, NCC मधील सहभाग, शासनाच्या योजनांच्या अंमलबजावणीतील वास्तव, माहितीतील दरी आणि लोकसहभागाचे महत्त्व स्पष्ट करत मंत्रालयातील हा संवाद विद्यार्थ्यांसाठी शासनव्यवस्थेचे प्रत्यक्ष आकलन करून देणारा आणि सामाजिक बांधिलकीची जाणीव दृढ करणारा ठरेल.